रविवार, दि. २ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ७१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# एसपी साहेब, अपर पोलीस अधिक्षक म्हणतात; ‘जाहिरातीसाठी फंड नाही’; मग पाकिटांसाठी फंड कुठून येतो?

## जालना पोलिसांमधील भ्रष्टाचाराचे नवे प्रकरण, वाटप झालेल्या पाकिटांवरून संतापाची लाट!

**दीपक शेळके**

**जालना -** जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटली असून, ‘वसुली अधिकारी झाले वाटप अधिकारी’ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. काही पोलीस ठाण्यांतील अधिकारी आणि कर्मचारी हे कायद्याचे रक्षणकर्ते न राहता हफ्तेखोर आणि दलालांच्या जाळ्यात अडकले आहेत. गेल्या पंधरवड्यापासून युवा आदर्शने पत्रकारांना पोलीस ठाण्यांकडून दिल्या जाणाऱ्या पाकिट वाटप प्रकरणाचा मुद्दा ठळकपणे मांडला. मात्र, या गंभीर प्रकारावर पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी मौन बाळगल्याने नागरिकांत नाराजी वाढली आहे.

अलीकडेच अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांची भेट घेऊन या प्रकरणाबाबत विचारणा करण्यात आली असता, त्यांनी जाहिरातीसाठी फंड नाही असे सांगितले. परंतु, जर जाहिरातींसाठी फंड नाही, तर पत्रकारांना वाटण्यात आलेल्या या पाकिटांसाठी फंड कुठून येतो, हा प्रश्न आता सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे. नोपाणी यांचे हे विधान म्हणजे अप्रत्यक्षरीत्या पाकिट वाटपाला पोलीस विभागाची ‘मुक संमती’ असल्याचे संकेत मानले जात आहेत. युवा आदर्शने याच विषयावर वसुली अधिकारी झाले वाटप अधिकारी या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केली होती. त्यानंतर प्रकरणाचे गांभीर्य वाढले असून, या बातमीतील तथ्ये आता एकामागोमाग एक समोर येत आहेत.

**गुटखा माफिया, सट्टा, मटका, अवैध बार, वाळू तस्करी; सर्वत्र वसुलीचे साम्राज्य**

शहरात गुटखा माफिया सतिश उर्फ लालाचा धंदा बेधडक सुरू असून, टनोनटन गुटखा बाजारात विक्रीस येतो. वाळू माफिया, सट्टा, मटका, लॉटरी, अवैध दारू, चक्री, लाल-काळा यांसारखे धंदे ठिकठिकाणी खुलेआम सुरू आहेत. या सर्व अवैध व्यवसायांमागे दर महिन्याचा हफ्ता पद्धतशीर आकारला जात असल्याची माहिती मिळाली आहे. शहरातील चंदनझिरा, बसस्थानक परिसर, रेल्वे स्टेशन परिसर, सिंधी बाजार, लक्कडकोट, गांधीनगर, अशा अनेक भागांत हे धंदे दिवसाढवळ्या सुरू आहेत.

या व्यवसायांना सुरू करण्याआधी संबंधित ठाण्यातील अधिकाऱ्यांची ‘भेट’ घेतल्याशिवाय कोणीही हात उचलत नाही. काही ठिकाणी ही मध्यस्थी करण्यासाठी बोगस पत्रकार दलाल म्हणून कार्यरत असल्याची माहिती युवा आदर्शच्या हाती आली आहे. हे दलाल पोलिस आणि अवैध धंदेवाल्यांमध्ये कमिशन एजंट म्हणून कार्य करतात.

याबाबत पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांनी विचारणा केली, तर युवा आदर्शकडे संबंधित व्यक्तींची मोबाईल क्रमांकासह संपूर्ण माहिती देण्यास तयार आहे. त्या क्रमांकांचे सीडीआर आणि कॉल रेकॉर्ड तपासल्यास, हफ्तेखोरीचे जाळे उघड होईल.

**रात्रीच्या वेळी अवैध धंद्यांचे राज**

सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्री उशिरापर्यंत हॉटेल, बार, पान टपरी, पावभाजी सेंटर, धाबे सुरु असतात. काही दिवसांपूर्वी एका बेकरीवाल्याला पैशाच्या कारणावरून मारहाण झाल्याची घटना घडली. त्या वेळेस (रात्री ११ नंतर) आस्थापना उघडी का होती, हा गंभीर प्रश्न उपस्थित होतो. योग्य गस्त, तपासणी आणि नियंत्रण झाले असते, तर ही घटना घडलीच नसती.

सदर बाजार आणि चंदनझिरा पोलीस ठाण्यांतील परिस्थिती जवळजवळ सारखीच आहे. काही कर्मचारी कारवाईपेक्षा वसुलीमध्ये व्यस्त असतात. त्यामुळे गुन्हेगारी आणि गुंडगिरीचा प्रादुर्भाव वाढत आहे.

**‘सोने का पालना’ असलेल्या जालन्याची प्रतिमा धोक्यात**

कधीकाळी जालना सोने का पालना म्हणून ओळखले जाणारे हे शहर आता भ्रष्टाचार, हफ्तेखोरी आणि गुंडगिरीच्या विळख्यात सापडले आहे. नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत झाला आहे.

म्हणूनच नागरिक आणि पत्रकार संघटनांकडून मागणी होत आहे कीं पोलीस अधीक्षकांनी तातडीने या प्रकरणाची सखोल चौकशी करून, पाकिट वाटप प्रकरणातील संबंधित अधिकारी व दलालांवर कठोर कारवाई करावी. अन्यथा, जालना जिल्ह्याची प्रतिष्ठा आणि पोलिस यंत्रणेची प्रतिमा उद्ध्वस्त होईल,

### भ्रष्टाचाराने बरबटलेल्या जालन्यातील पोलीस खात्याला ‘खमक्या’ अधिक्षकांची गरज!

गुन्हेगारी व गुटखा माफियांच्या वाढत्या साखळीवर नागरिकांतून तीव्र संताप शहरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे आणि पोलीस विभागातील भ्रष्टाचाराच्या वाढत्या स्तरामुळे नागरिकांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी जालना जिल्ह्यातील खासदार, आमदार, व्यापारी तसेच विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन कायदा-सुव्यवस्थेची बिघडती परिस्थिती गांभीर्याने लक्षात आणून दिली होती. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत काहीही सुधारणा दिसून येत नाही. उलट पोलीस यंत्रणेतील हफ्तेखोरी, आळशीपणा आणि सत्ताधाऱ्यांचे संरक्षण यामुळे जालना पोलीस खाते भ्रष्टाचाराने बरबटलेले असल्याची भावना जनतेत तीव्रतेने व्यक्त होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यातील गुटखा माफिया पुन्हा डोकं वर काढत आहेत. सतिश उर्फ लालासारख्या माफियांचे गुटखा टनोनटन प्रमाणात शहरात आणि ग्रामीण भागात बेधडक विकले जात आहेत. या गुटख्याचा साठा कुठे होतो, कोणत्या माध्यमातून विक्रीसाठी पुरवठा केला जातो, आणि ही अवैध साखळी इतक्या आत्मविश्वासाने कशी चालते. याचे उत्तर मात्र पोलीस खात्याकडे नाही. उलट, जनतेत ही खात्री निर्माण झाली आहे की या अवैध व्यापारामागे पोलीस यंत्रणेतील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचे ‘संरक्षण’ आणि ‘हफ्तेखोरीचे जाळे’ सक्रिय आहे.

पोलीस विभागाने वेळोवेळी कारवाईचे दावे केले असले तरी ती फक्त कागदोपत्री असल्याचे आरोप होत आहेत. वास्तविक परिस्थितीत मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री सुरु असून, शहरातील काही भागांत उघडपणे गुटख्याचे वितरण केले जात असल्याचे दृश्य सर्वसामान्यांना रोज दिसत आहे. यामुळे नागरिक आणि **पान २ वर**

युवा आदर्श

## कुबड्या ...

असा हेका काहींचा
स्व बळावरचं लढवू
जिंकू अधिक जागा
पक्षांस चौफेर वाढवू
फिनिक्स पक्षा समान
पुनश्च पक्षाला मढवू
आखाड्यात उतरवून
मस्त पैलवान भिडवू
थांबव आता आक्रोश
इतरांना जोरात रडवू
इतिहासात ना रमावे
उज्वल भविष्य घडवू
ऐकत राहिलो सल्ला
आवाज वरचा चढवू
चढू लागले खांद्यावर
ते पाया खाली तुडवू
विषय बनलोयं चेष्टेचा
एकदा दुसऱ्या चिडवू
खूप साहतो अडवणूक
प्राबल्ये बाकीचे अडवू
पराजय निरोप आरंभ
ढोल जयघोषां बडवू
गरज नाही मदतीची
कुबड्या सवय सोडवू

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# मंडळ अधिकारी यांनी अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या रविवारपर्यंत अपलोड कराव्यात - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना | प्रतिनिधी -** अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या याद्या रविवार पर्यंत (दि.२) ऑनलाईन अपलोड करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व मंडळ अधिकाऱ्यांना स्पष्ट दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्ह्यातील सर्व मंडळ अधिकारी यांच्या आढावा बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, अपर तहसीलदार जालना करिश्मा पुजारी यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या की, शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळण्यासाठी प्रशासनाने गतीने काम करणे अत्यावश्यक आहे. विलंब झाल्यास जबाबदार अधिकारी यांच्यावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत कारवाई केली जाईल. विहित नमुन्यात याद्या तयार करणे, याद्या पोर्टलवर अपलोड करणे, त्या याद्याना मान्यता देण्याकरिता विशेष कॅम्पचे आयोजन करून येत्या दोन दिवसात याद्या अपलोड करण्याचे काम पूर्ण करावेत.

प्रत्येक तालुक्यातील मंडळ अधिकारी, तलाठी आणि कृषी विभागाचे अधिकारी यांनी समन्वय साधून याद्या तयार करून, अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच याद्या अचूक आणि पारदर्शक असाव्यात, यावरही जिल्हाधिकाऱ्यांनी भर दिला आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी अनुदान वाटपसंबंधीचा शासन निर्णय २९ ऑक्टोबर रोजी प्राप्त असून दोन दिवसात ८0000 शेतकऱ्यांच्या खात्यात तत्काळ मदत मिळावी याकरिता अहोरात्र हे काम नोंदणी वाढवावी, प्रलंबित प्रकरणे व ई फेरफारची प्रकरणे




याद्या पोर्टलवर अपलोड होऊन, त्यास मंजुरी देण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या करण्याचे जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिलेत.

ग्रीस्टॅककरीता शेतकरी विहीत मुदतीतता तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले.

## भगतसिंग नगर घरफोडी प्रकरण उघडकीस; स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

# आरोपी जेरबंद, रु. ६ लाख ६४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना | प्रतिनिधी -** भगतसिंग नगर परिसरात झालेल्या मोठ्या घरफोडी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या दोन दिवसांत उलगडा करत एक आरोपीला जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी आरोपीकडून तब्बल रु. ६,६४,000/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये रु. ६,४0,000/- रोख रक्कम, २२,५00 रुपयांचा मोबाईल फोन, ब्लूटूथ हेडसेट आणि चोरीसाठी वापरलेला मोबाईल फोन यांचा समावेश आहे.

ही घटना दिनांक ३0 ऑक्टोबर २0२५ रोजी फिर्यादी गणेश बाबुराव वाढेकर (वय ४३ वर्षे, रा. भगतसिंग नगर, नवीन मोंढ्याच्या पाठीमागे, जालना) हे भाजीपाला विक्रीसाठी नाव्हा येथे गेले असताना, त्यांच्या अनुपस्थितीत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे चॅनल गेट व लॉक तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातून रु. ७ लाखांची रोकड चोरी केली. याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं. ५७0/२0२५, कलम ३0५(), ३३१(३) भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**पोलिसांची तपासमोहीम आणि आरोपीचा शोध**

घटनेनंतर पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना विशेष सूचना दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असताना, १ नोव्हेंबर २0२५ रोजी गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आकाश भास्कर लिखे (वय २५ वर्षे, रा. भगतसिंग नगर, जालना) या तरुणानेच चोरी केल्याची शक्यता



आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी बदनापूर परिसरात सापळा रचून संशयित आकाश लिखे याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरी केल्याची कबुली दिली, आणि चोरी केलेला मुद्देमाल कुठे लपवला आहे हेही सांगितले. पोलिसांनी तत्काळ छापा टाकून रु. ६,४0,000/- रोख रक्कम, मोबाईल फोन, ब्लूटूथ हेडसेट, आणि चोरीत वापरलेला बेसिक मोबाईल असा एकूण रु. ६,६४,000/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार **पान २ वर**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवारी अर्जांचे वितरण सुरु

**जालना | प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील विविध स्थानिक स्वराज्य संस्था - जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने उमेदवार निवड प्रक्रियेला गती दिली असून, पक्षाचे अधिकृत अर्ज (उमेदवारी फॉर्म) २ नोव्हेंबर २0२५पासून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

काँग्रेस पक्षाच्या लोकाभिमुख धोरणांनुसार, आगामी निवडणुकांमध्ये विकासाभिमुख, पारदर्शक आणि सामाजिक न्यायासाठी वचनबद्ध उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. पक्ष संघटनांनी कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीसाठी तयारीचे वातावरण निर्माण करावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी केले आहे.

**अर्ज / फॉर्म उपलब्धतेची माहिती**

इच्छुक उमेदवारांना काँग्रेस पक्षाचे अधिकृत अर्ज (उमेदवारीसाठी प्रस्ताव फॉर्म) खालील कार्यालयांमधून मिळणार आहेत. हे फॉर्म भरून संबंधित तालुका अध्यक्ष किंवा शहराध्यक्ष यांच्याकडे परत जमा करावेत.

**जालना शहर काँग्रेस** अतिक खान - शहराध्यक्ष
रवी प्राइड कॉलोनी, निवांत हॉटेल **पान २ वर**

## ‘वंदे मातरम’ गीताची १५० वी वर्षपूर्ती

देशाच्या ‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताला यंदा १५०वर्षे पूर्ण होत आहे. बकिमचंद्र चटोपाध्याय रचित ‘वंदे मातरम’ या भारताच्या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीला ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी तिथीनुसार म्हणजेच, कार्तिक शुद्ध नवमीला तसेच दैनंदिन वापरातील ग्रेगरीयन कॅलेंडरनुसार, ७ नोव्हेंबर २०२५ रोजी ‘वंदे मातरम्’ या गीताच्या निर्मितीला एकशे पन्नास वर्षे पूर्ण होत आहे. एकविसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात जन्मलेल्या बकिम चंद्र चटोपाध्याय या बंगाली,कवी,पत्रकार, साहित्यिकांनी ‘वंदे मातरम’ गीताची रचना केली होती. हे गीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे प्रेरणा गीत बनले. लेखकाचा पिंड असलेले बकिमचंद्र चटोपाध्याय कवी,पत्रकार म्हणून प्रसिद्ध होते. 'आनंदमठ' या त्यांनी लिहिलेल्या कादंबरीत वंदे मातरम हे गीत पहिल्यांदाच १८७५ मध्ये प्रसिद्ध प्रकाशित झाले. या गीताची रचना बंगाली संस्कृत मिश्र भाषेत करण्यात आली होती. त्यावेळी भारत ब्रिटिश साम्राज्याखाली होता आणि देशांतर्गत ब्रिटिश राजवटी विरुद्ध अनेक मार्गाने बंड पुकारल्या जात होते. अशा प्रसंगी वंदे मातरम् गीताने भारतीय लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्याचे कार्य केले होते. हे गीत बंगालच्या हुबळी नदीजवळील चीनसुरा येथे लिहिल्याचे म्हटले जाते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश राजवटीचा निषेध करण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावली आणि हे गीत लोकप्रिय म्हणून उदयास आले होते. म्हणून ब्रिटिश साम्राज्याने 'आनंदमठ' या कादंबरीवर बंदी घातली होती. तत्कालीन जनता या बंदीला जुमानत नव्हती. सर्वप्रथम हे गीत १८८६ ला अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात गायले गेले. रवींद्रनाथ टागोरां नंतर १९०१ मध्ये कलकत्ता येथे झालेल्या दुसऱ्या कॉंग्रेस अधिवेशनात दक्षिणा चरण सेन यांनी हे गीत गायले. १९०५ ला रवींद्रनाथ टागोरांची पुतणी कवियत्री अरुणादेवींनी कॉंग्रेसच्या अधिवेशनात हे गीत गायले. १९०५ मध्ये पहिला राजकीय चित्रपट हेमलाल सेन यांनी तयार केला. पुढे १९०५ मध्ये भिकाजी कामा यांनी जर्मनीतील स्टुटगार्ड येथे भारताच्या राष्ट्रध्वजाच्या पहिल्या आवृत्तीची चौकट तयार करण्यात करण्यासाठी उपाय योजना केल्या,आणि त्यांनी ध्वजाच्या पट्टीच्या मध्यभागी ‘वंदे मातरम’ लिहिले. महात्मा गांधींनी १९४६ मध्ये वंदे मातरम् राष्ट्रगीताला स्वीकारण्याचा पाठिंबा दिला. परंतु 'जय हिंद' ची जागा घेऊ नये असे त्यांनी म्हटले.सुरुवातीला लोकांनी 'वंदे मातरम' हे भारतीय राष्ट्रगीत म्हणून ठेवले. नंतर अनेकांना वाटले की, हे गीत केवळ एका धर्माचे आहे. त्यावर अनेक मतभेद निर्माण झाले. राष्ट्रगीत दर्जातून वंदे मातरम् ला काढून टाकण्यात आले. आणि ‘जन-गण-मन’ हे देशाचे राष्ट्रगीत म्हणून ठेवण्यात आले. परंतु त्याच प्रसंगी ‘वंदे मातरम’ गीताला राष्ट्रीय गीत म्हणून सन्मान करण्यात आला आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत ‘वंदे मातरम’ गीताला जेवढे महत्त्व होते, त्यासोबतच ‘वंदे मातरम’ हे दोन शब्दांचे घोषवाक्य क्रांतिकारांचे प्रेरणा घोषवाक्य ठरली. आजही आपणास वंदे मातरम् च्या घोषणेने राष्ट्राभिमान उराशी दाटून येतो.

**शशिकांत मधुकर तोटे, दारव्हा, जि.यवतमाळ९१३०८३५४५८**

# एक तरी वारी आचरावी !

...चंद्रभागेच्या तिरावर पंढरपूर येथील विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी अफाट जनसागर (वारकरी, गरीब-श्रीमंत, आंधळे-पांगळे, सर्व जाती-धर्माचे) आषाढी एकादशी दिवशी टाळ-मृदुंगाच्या गजरात 'विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोविला... असे म्हणत' पंढरपूरमय होतो.

महाराष्ट्रात मध्ययुगामध्ये अनेक भक्तिसंप्रदाय उदयास आले आणि कमी-अधिक काळ आपला प्रभाव गाजवून क्षीण झाले किवा नाम शेष झाले, मात्र महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय याला अपवाद ठरला आहे. या संप्रदायाचा प्रभाव सतत वाढतच राहिलेला आहे. अगदी १९व्या, २० व्या आणि २१ व्या विज्ञाननिष्ठ शतकामध्येही हा संप्रदाय टिकून आहे. एवढेच नव्हे तर तो सम ाजशास्त्र आणि साहित्य संशोधक यांच्या कुतूहलाचा विषय होऊन राहिला आहे. पंढरपूरची वारी हा प्रकार महाराष्ट्रातील वारकरी भक्तिसंप्रदायाला इतर भक्तिसंप्रदायांपासून खास रितीने वेगळा ठरविणारा आहे. काही तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धीला आलेल्या किंवा पुराणकाळापासून माहात्म्य लाभलेल्या काशी, जगन्नाथपुरी, बद्रिकेश्वर, बालाजी तिरुपती, रामतीर्थ इत्यादी तीर्थक्षेत्रासारखे पढरपूर हे क्षेत्र नाही. पंढरपूरची वारी हा तीर्थक्षेत्रापेक्षा वेगळा प्रकार आहे. पंढरपूरची वारी करणे म्हणजे, तीर्थयात्रेचे पुण्य गाठीस बांधणे अशी काही भावना कोणताही वारकरी बाळगून नसतो. दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे,


ह.भ.प.कै.जनाबाई शिवाप्पा संकपाळ.

इतर तीर्थक्षेत्रांना यात्रा महणून जाऊन येण्याचा दबाज (पद्धत) असचा व्याक भनेचा दैनंदिन जीवनाशी अतूट संबंध असतोच असे नाही. उलटपक्षी तो तगा नसतो असे म्हणता येईल; परंतु पढरपूरची वारी करणाऱ्या माणसांचे जीवन अगदी बदलून जावे अशी अपेक्षा असते. मुख्य म्हणजे आपण वारकरी असून वारकऱ्याचे व्रतस्थ जीवन जगत आहोत याची निदर्शने करणाऱ्या तुळशीमाळा, त्रिपुंडा किंवा खांद्यावर 'भगवी पताका व तो टाळ-मृदुंगाचा आवाज यासारख्या खाणाखुणा त्याने निश्चयाने बाळगाव्यात अशीही अपेक्षा असते एवढेच नव्हे तर त्याने भगवद्भक्ती करावी, कोणत्या यंत्राचे आणि ग्रंथाचे पंठण करावे यासंबंधानेही काही आदेश असतात. खरा वारकरी या आदेशांचे जास्तीत जास्त पालन करण्यात धन्यता मानतो. अन्य पंथांमध्ये दाखल होणाऱ्या भक्तांवर अशाच प्रकारच्या आदेशांचे निबंध असले, तरी त्या निर्बंधांना कर्मकांडाचे स्वरूप आलेले असते. वारकरी पंथामध्ये कर्मकांडाचा मुळागत निर्बंध केलेला आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अन्य भक्तिसंप्रदायांपेक्षा असलेले वेगळेपण अनेक प्रकारे सांगता येईल. येथे फक्त एका महत्त्वाच्या गोष्टीचा निर्देश करायचा आहे, तो म्हणजे वारकऱ्यांचे कुलदैवत कुठलेही असो, वारकरी होताच पंढरपूरच्या विठ्ठलाचा भक्त होऊन जाता, यातही पुन्हा वैशिष्ट्य असे पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती स्वीकारल्यावर अन्य देवतांच्या भक्तीचा त्याने त्याग करावयास पाहिजे असे बंधन त्याच्यावर नसते. त्यातूनच मग तो ईश्वराकडे (परमेश्वर) एकत्वबुद्धीने पाहण्यास शिकतो, म्हणूनच महासमन्वय ही संस्कृती घेऊन उभा राहिलेला वारकरी पंथ महाराष्ट्रात नुकताच लोकप्रिय झाला असे नव्हे, तर शतकानुशतके खंबीरपणे पाय रोवून स्थिरावला आहे. ज्ञानदेव, नामदेवाच्या काळी महाराष्ट्रावर असलेल्या अस्मानी-सुलतानी आपत्तीमध्ये जनतेचा धीर खचू न देता त्यांची मने समर्थ बनविण्याचे काम या थोर संतांच्या भागवत धर्माने केले, ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बळ, वीर्य, तेज या सहा गुणांनी संपन्न असणाऱ्या भगवंताचा धर्म शक्तिगर्भआहे. यातून स्वराज्य प्राप्त होते, रक्तहिन सामाजिक क्रांतीची विचारधारा निर्माण करण्याची ताकद या विचारसूत्रीत असली, तरी या गोष्टीस दुबळेपणा-भेकडपणाचे स्वरूप नसावे, म्हणून संत तुकाराम म्हणतात, 'तरी भले देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या माथी हाणु काठी । वारकरी संघाच्या विचारांत जातिभेद, विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा विचार होताना विठ्ठल उपासना आणि पंढरपूर वारीचे पडसाद उम



## वसा वारकरी सांप्रदयाचा

टतात. ईश्वरप्राप्तीसाठी संसार न सोडता संसारात राहूनदेखील पारमार्थिक आनंद मिळवता येतो हे वारीतून दिसून येते. जीवनाचे ध्येय भक्ती हेच मानले आहे. मनामनातील मशागत, करणारा वारकरी संप्रदाय जीवन अंतर्बाह्य बदलून टाकतो, शुद्धाचरण सात्विक आहाराबरोबर चांगल्या विचारातून परस्पर द्वेष, मद, क्रोध, त्वेष यांसारख्या गोष्टींपासून दूर राहण्याची शिकवण जणू वारी-वारकरी आचारात मिळते, यालाच आध्यात्मिक अभ्यास म्हटला जातो. वारीला सुरुवात केली की, वर्षानुवर्षे पायी वारी करून वारकरी विठ्ठलमय होतात, वारीची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. कोल्हापूरच्या गडहिंग्लज तालुक्यातील जखेवाडी गावच्या ह.भ.प के. जनाबाई शिवाप्पा संकपाळ यांनी आयुष्यात ३६ पायी वाऱ्या केल्या. १०५ व्या वर्षी माऊलीचे निधन झाले. त्यांची शेवटची इच्छा अशी होती की माझी अस्ति पंढरपूरच्या चंद्रभागेत करावी त्यांचे नातू..देवदास संकपाळ यांनी अस्तितचंद्र बघत जाऊन विसर्जन करून आपल्या आजीची शेवटची मनोकामना पुरी केली.त्यानंतर त्याच्या मोठ्या सूनबाई इंदुबाई मारुती संकपाळ तसेच त्यांचे पुत्रूड...शिवाजी चौगुले व त्यांच्या पत्नी प्रियांका यांनी तुळशीम ाळ घालून वारीची परंपरा अखंडपणे सुरू ठेवली आहे.

पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत ।। व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी मुखी नाम।। नाम विठोबाचे घेईन मी वाचे। बीज कण्यांतीचे तुका म्हणे...!!

वारकऱ्यांचा पोषाख पांढरा शुभ्र कुडता, धोतर व डोक्यावर टोपी, गळ्यामध्ये तुळशीच्या माळा, हातामध्ये भगवा पताका व कपाळावर गंध, भजन-कीर्तनामध्ये ते. धुंद असतात. धुंद असतेवेळी बघताना असे वाटते की, आपणही त्यांच्यामध्ये मग्न व्हावे, म्हणून आयुष्याला येऊन एक तरी वारी आचरावी... पंढरपूरची...!!

!! जय जय राम कृष्ण हरी!!

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.बेलेवाडी (मासा) कागल- कोल्हापूर.**

# तणाव मुक्तीसाठी माणसांच्या संपर्कात रहा...

आपल्या भारत देशात मनोरुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. माणसाचे माणसांच्या संपर्कात राहणे कमी झाल्यामुळे व माणूस एकाकी जीवन जगत असल्याम ुळे माणूस तणावग्रस्त व मनोरुग्ण होऊन आपल्याच धुंदीत जीवन जगत आहे. आधुनिक युगात माणूस मोबाईलमध्ये पुरता गुरफटून गेला आहे. मोबाईलचा अतिवापर माणसांना मनोरुग्ण होण्यास कारणीभूत ठरू शकतो. हल्ली पैसा कमावण्यासाठी माणूस अहोरात्र मेहनत करत आहे. पैशाच्या मागे बेफामपणे धावतपळत सुटला आहे. पैसा कमावण्याच्या नादात जिवलग मित्र, नातेवाईक, स्वतःचे आईवडील, बहिण भाऊ आणि रक्ताची नाते यांकडे दुर्लक्ष करून आपल्याच नादात जीवन जगत आहे. काही महाभाग तर पैशाला एवढे हापापलेले असतात की, पैसा कमावण्याच्या नादात स्वतःच्या बायको लेकरांकडे दुर्लक्ष करून पैसा पैसा करत आहेत. प्रत्येकाला नात्यापेक्षा पैसा महत्त्वाचा वाटत आहे. पैशासाठी माणूस वाट्टेल त्या थराला जात आहे. पैसा व संपत्तीच्या नादात माणूस सख्या भावाला परका होत आहे. सख्या भावासोबत वादविवाद करून नात्याला कलंकित करत आहे. दररोज शेतीच्या वादाचे अनेक खटले पोलीस स्टेशनमध्ये दाखल होत आहेत. माणूस उठता बसता सारखा पैसा पैसा करत आहे. पैशापुढे त्याला इतर सर्व गोष्टी गौण वाटत आहेत. पैसा कमावण्याच्या नादात माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. जवळ पैसा असला की माणूस आनंदात न्हाऊन निघत आहे. आणि जवळ पैसा नसला की माणूस दुखी व निराश होत आहे. यातूनच त्याच्या वाट्याला दुःख व नैराश्य येत आहे. परिणामी माणूस मनोरुग्ण होऊन मनमानी जीवन जगत आहे. आजकाल मनोरुग्णांची संख्या वेगाने वाढत चालली आहे. माणूस पैसा कमावण्याच्या नादात नातीगोती विसरून एकलकोंडे जीवन जगत आहे. माणसाच्या चेहऱ्यावरून हास्य लोप पावले आहे. प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या तरी विचारात मग्न होत आहे. त्याला नैराश्यातून बाहेर पडण्यासाठी व चांगला माणूस म्हणून घेण्यासाठी माणसांच्या संपर्कात राहणे काळाची गरज बनली आहे. त्यासाठी माणसाने थोडा तरी वेळ आपल्या म ाणसांशी हितगुज साधण्यासाठी व चार शब्द प्रेमाने बोलण्यासाठी उपयोगात आणावा. त्यासाठी माणसांमध्ये बसून सकारात्मक विचारांची देवाण-घेवाण करावी. तणाव मुक्त जीवन जगण्यासाठी माणसाने थोडा तरी वेळ राखीव ठेवावा. मोबाईलचा वापर कामापुरता व गरजेपुरताच करावा..मोबाईलमुळे माणसे माणसांपासून दूर झाली आहेत. माणूस म ाणसांमध्ये बसायला व त्यांची ख्यालीखुशाली विचारायला तयार नाही. माणसांच्या संपर्कात राहिल्यामुळे माणूस तणाव मुक्त व टेन्शन मुक्त जीवन जगतो. दुःखात, व गंभीर परिस्थितीत माणसाने माणसाच्या सहवासात राहणे खूप महत्त्वाचे असते. परंतु आजकाल प्रत्येकाकडे मोबाईल आल्यामुळे व घरोघरी टीव्ही असल्यामुळे माणूस या दोन माध्यमात रममान होत आहे. माणसाला टेन्शन मुक्त राहण्यासाठी चांगल्या व निर्मळ मनाच्या माणसांच्या सहवासात राहणे हे अधिक महत्त्वाचे असते. त्यासाठी माणसाने पैशाचा अतिमोह टाळावा. शेतीमध्ये किंवा आपल्या कार्यक्षेत्रामध्ये पूर्ण वेळ देणे हे तणाव मुक्तीसाठी महत्त्वाचे कारण ठरू शकते. जो माणूस सातत्याने माणसांमध्ये राहतो व पुस्तकांच्या सहवासात रमतो, तो माणूस आयुष्यात कधीच तणावग्रस्त होऊ शकत नाही. माणसाला जीवन जगण्यासाठी पैशापेक्षा माणसे महत्त्वाची असतात. ऐनवेळी संकटात व वाईट काळात पैशापेक्षा म ाणसेच अधिक कामाला येतात. आजकाल तणावग्रस्त लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मनोरुग्णालयात तणावग्रस्त लोकांची संख्या प्रचंड वाढली आहे. गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा तरी ताण असतोच. म्हणून माणसाने कोणत्याही गोष्टीचा ताण न घेता व आर्थिक परिस्थितीला दोष न देता आलेल्या संकटावर हिंमतीने मात करावी. एकलकोंडे जीवन जगू नये. नेहमी माणसांमध्ये रममान व्हावे... चांगल्या व सज्जन माणसांमध्ये बसून विचारांची देवाण-घेवाण करावी... जीवनात वेगवेगळे छंद जोपासावेत. जसे की, क्रीडा क्षेत्रात स्वतःला झोकून द्यावे... वाचन व लेखन छंद जोपासावा...वेगवेगळे मैदानी खेळ खेळावेत.. मोबाईल पासून जरा अलिप्तच राहावे.. गरजेपुरताच मोबाईलचा वापर करावा..गरजेपुरताच पैसा कमवा...पैसा कमावण्याच्या नादात अधिक उतावीळ होता कामा नये. घरातील टीव्हीचा वापर चांगले मनोरंजनात्मक चित्रपट बघण्यासाठी व चांगल्या सुसंस्कारी मालिका बघण्यासाठी करावा.. घरी शेती असेल तर शेतीमध्ये काम करावे... आपापल्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन काम केल्याने माणूस कामात रममान होऊन टेन्शन मुक्त जीवन जगतो. त्यासाठी प्रत्येकाला विनंती आहे की बांधवांनो, पैशाचा अतिनाद बरा नाही..मोबाईलम ध्ये जास्त रमणे व पैशाच्या मागे बेभान होऊन धावत पळत सुटणे हे आपल्यासाठी धोकादायक ठरू शकते... म्हणून माणसाने गरजेपुरताच पैसा कमावून माणसे सांभाळणे नातेवाईकांना व मित्रांना जीव लावणे हे काम करावे...एकलकोंडे राहून जीवन जगण्यापेक्षा माणसांमध्ये मिळून मिसळून आनंदी जीवन जगणे हे अधिक महत्त्वाचे असते...त्यासाठी माणसाने माणसांच्या संपर्कात राहणे काळाची गरज आहे...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

### वाचकांचे मनोगत

## निसर्गातील बदलाल माणूस जबाबदार

भारतात वर्षभरात तीन ऋतूचक्र कार्यरत आहेत. पावसाळा,हिवाळा,उन्हाळा चार-चार महिन्याचे कालचक्र आहे. निसर्गावर माणसाचे जीवनमान अवलंबून आहे.ऋतूचक्रानुसार शेतकरी धनधान्य,फळ लागवड,भाजीपाला यांची पीके घेतो. पाऊसा पडणे निसर्ग निर्मित आहे.पूर्वीच्या काळी सात जून रोजी मृग नक्षत्र सुरू होताच हमखास पाऊस पडत असे.शेतकरी भात शेतीच्या कामाला सुरूवात करी.यंदा तर पावसाने कहर केला .मार्च - एप्रिल महिन्यात नद्या,वाहाळ,विहीरी,तलाव यामधील पाणीसाठा संपत होता.मे महिन्याच्या दुसर्या आठवड्यात पाऊस पडण्यास सुरूवात झाली. शेतकरी खूष झाला.कोकणातील शेतकऱ्याने भात पेरणी केली.हापूस आंबा झाडावर काढायचा राहिला.१२५ कोटी रुपयाचा हापूस आंबा खराब झाला.यंदा भात शेतीला उत्तम पाऊस लाभला भातशेतीतून उत्तम उत्पन्न मिळेल असे अंदाज शेतकऱ्याने बांधले.भात पीक तयार झाले.पाऊस काही थांबायचे नाव घेईना.हातातोंडाशी आलेले पीक वाया गेले. सप्टेंबर महिन्यात पाऊस थांबतो.हवामान खात्याचे अंदाज कधीच मार्गदर्शक ठरले नाहीत. एकच सूर वळवाचा पाऊस म्हणजे अरबी सम ुद्रात उसळणार्या कमी दाबाच्या पट्ट्यामूळे पाऊस तुरळक पडेल असे अंदाज वर्तवत असते. निसर्गातील बदलाला माणूस जबाबदार आहे. पर्यावरणाचा र्हास होतो आहे.प्रदुषणाचे दुष्परिणाम जाणवत आहेत. धुळीचे प्रदुषण, वायु प्रदुषण,दुर्गंधीने प्रदुषण, आवाजाचे प्रदुषण याला माणूस जबाबदार आहे. माणसाचे आपल्या दैनंदिन जीवनात प्रदुषण नियंत्रणात आणणे अतिशय महत्वाचे आहे.कधी सुका दुष्काळ तर कधी ओला दुष्काळाचे रहाटगाडगे सुरू आहे.सरकार मात्र विरोधक जेव्हा नुकसान भरपाई मिळावी म्हणून मागणी करतात तेव्हा नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देऊन मोकळे होते.खऱ्या रोगावर उपचार करीत नाही. प्रदुषण रोखण्यात यश येईल तेव्हाच निसर्गाची चक्रे सुरळीत फिरतील. सरकारनेच निसर्गातील बदलाचा शोध घेऊन उपाययोजनांबाबत निर्णय घ्यावा.तेव्हाच पुढील टाळण्यास मदत होईल.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

पान १ वरुन

## भ्रष्टाचाराने बरबटलेल्या ...

व्यापारी वर्गातून एकच मागणी जोर धरू लागली आहे. जालना जिल्ह्यास आता खमक्या, प्रामाणिक आणि निष्पक्ष पोलीस अधिक्षकांची आवश्यकता आहे. एक असे अधिकारी जे राजकीय दबाव आणि स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांपासून स्वतंत्र राहून कार्य करतील, तसेच भ्रष्टाचाराच्या मुळाशी जाऊन त्याचे उच्चाटन करतील.

जालना हे औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे जिल्हा असून, येथे विविध व्यावसायिक, व्यापारी आणि कामगारवर्गीय नागरिक मोठ्या संख्येने राहतात. त्यामुळे शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि गुन्हेगारीवर नियंत्रण हा प्रशासनाचा प्रमुख विषय असायला हवा. मात्र सध्याच्या परिस्थितीत सर्वच क्षेत्रांत पोलिसांवरील विश्वास डळमळीत झाला आहे.

नागरिकांमधून अशी मागणी केली जात आहे की - जालना जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेतील गटबाजी, हफ्तेखोरी आणि गुटखा माफियांचे संरक्षण या सर्व प्रकारांची उच्चस्तरीय चौकशी व्हावी. तसेच जालना जिल्ह्यास प्रामाणिक, धाडसी व भ्रष्टाचारमुक्त प्रतिमेचे अधिकारी तातडीने नेमले जावेत.

जालन्यातील परिस्थिती लक्षात घेता, ‘खमके’ आणि ‘निर्भय’ पोलीस अधिक्षकच या शहराला नवा श्वास देऊ शकतील, अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

## आरोपी जेरबंद...

बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या म ार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ, तसेच अमलदार प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर आणि संदीप चिंचोले यांनी सहभाग घेतला.

**नागरिकांत समाधान**

स्थानिक गुन्हे शाखेच्या तातडीच्या आणि प्रभावी कारवाईमुळे नागरिकांत समाधान व्यक्त केले जात असून, चोरीच्या घटना उघडकीस आणण्यात जालना पोलिसांचे हे आणखी एक यश मानले जात आहे.

## स्थानिक स्वराज्य ...

जवळ, LPG Pump, संभाजीनगर रोड, जालना ८४८२८ ९७२५३

**अंबड तालुका कॉंग्रेस** कल्याण तार्डे - तालुकाध्यक्ष किनगाव चौफुली, अंबड, जि. जालना ९८२२६ ४७५०५

**जाफराबाद तालुका कॉंग्रेस** अजय ह. पा. बनकर - तालुकाध्यक्ष माऊली मेडिकल, देळेगव्हाण, ता. जाफराबाद ९७६५३ ९४०००

**घनसावंगी तालुका कॉंग्रेस** श्रीरंग कामठे - तालुकाध्यक्ष भोसले कॉम्प्लेक्स, अंबड-परभणी रोड, घनसावंगी ९०७५२ १८३३३

**जालना ग्रामीण तालुका कॉंग्रेस** कृष्णा पडुळ - तालुकाध्यक्ष
मा. खासदार डॉ. कल्याणराव काळे यांचे कार्यालय, अंबड रोड, जालना ९०६७२ २२७०६

**मंठा तालुका कॉंग्रेस** नीलकंठ वायाल - तालुकाध्यक्ष मंठा पोलीस स्टेशन समोर, जवाहर कॉलोनी, मंठा ९४२३७ १२३५१

**बदनापूर तालुका कॉंग्रेस** लक्ष्मण मसलेकर - तालुकाध्यक्ष जावेद बागवान निवास, रेल्वे स्टेशन रोड, बदनापूर ९४२२२ १९५१५

**परतूर तालुका कॉंग्रेस** बालासाहेब सि. आकात - तालुकाध्यक्ष तेलगड कॉम्प्लेक्स, कॉलेज रोड, परतूर ९९६०० ३७५५५

**भोकरदन तालुका कॉंग्रेस** त्रिबंकराव पाबळे - तालुकाध्यक्ष कॉंग्रेस कार्यालय, सिल्लोड रोड, भोकरदन ९४२२७ २२७९२

अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पक्षाच्या स्क्रीनिंग कमिटीमार्फत उम ेदवारांची मुलाखत आणि पार्श्वभूमी तपासणी करण्यात येईल. त्यानंतर जिल्हा आणि राज्यस्तरीय समितीकडून अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल.
या प्रक्रियेत युवक, महिला आणि समाजातील विविध घटकांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मोर्चासह धरणे आंदोलनाने दणाणले जाफराबाद शहर

# टेंभुर्णी, कुंभारझरी आणि जाफराबाद मंडळ ओल्या दुष्काळात समाविष्ट करण्याची मागणी

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील टेंभुर्णी जाफराबाद आणि कुंभारझरी हे तीन महसूल मंडळ ओल्या दुष्काळाच्या यादीत समाविष्ट न करण्यात आल्याने दुष्काळाची यादीत समावेश करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी ता.३१काढण्यात आलेल्या मोर्चांनी आणि धरणे आंदोलनाने जाफराबाद शहर दणाणले.जाफराबाद तालुक्यात सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र शासनाने अतिवृष्टी ग्रस्त आणि ओल्या दुष्काळाच्या यादीतून जाफराबाद, टेंभुर्णी आणि कुंभारझरी ही तीन महसूल मंडळ वगळल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जाफराबाद तालुका शाखेने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित केले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून ते तहसील कार्यालयापर्यंत पायी मोर्चाने जाऊन तहसीलच्या प्रांगणात धरणे आंदोलन करण्यात आले. मोर्चाचे नेतृत्व माजी आमदार चंद्रकांत दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जाफराबाद तालुका अध्यक्ष रामधन कळंबे यांनी केले. मोर्चामध्ये सहभागी शेतकऱ्यांनी कापसाच्या वाती झालेल्या टोपल्या , कोंब आलेल्या मका आणून लक्ष वेधले.जाहीर करा जाहीर करा, ओला दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांचा दिवाळ शासन म्हणत घ्या केळं अशा घोषणा देत या आशयाचे फलक हातात घेऊन शेतकरी आंदोलनात सहभागी झाले होते.

याविषयी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की वगळलेल्या तीनही मंडळांचा समावेश ओल्या दुष्काळात करण्यात यावा, शेतकऱ्यांच्या खात्यावर आर्थिक मदत वर्ग करण्यात यावी, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी बँकांनी लावलेला होल्ड हटविण्यात यावा, शॉट सर्किट मुळे उसाचे नुकसान झालेले शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी यासह विविध मागण्या या निवेदनातून करण्यात आलेल्या आहेत.





यावेळी माजी आमदार चंद्रकांत दानवे, तालुकाध्यक्ष रामधन कळंबे, रमेश सपकाळ, एकनाथ शेवत्रे, साबेद चाऊस, संजय लहाने, जनार्दन झोरे, रघुनाथ पंडित, शेख मुजीब, गणेश बापू चव्हाण, विनोद खेडेकर, ड. रामकृष्ण बनकर, नितीन शिवणकर, ड. विष्णु शिंदे, फहीमखा पठाण, एल.बी.शिंदे, शेख सऊद, गजानन लोखंडे, प्रभाकर अवकाळे, अमोल शेळके, गुड्डू मघाडे, बाबासाहेब जाधव, ज्ञानेश्वर शिंदे,राजू करवंदे, विठ्ठल गोरे, राजू सोनूने, शंकर चव्हाण, विनायक पंडित, राजू जाधव, प्रभाकर गायकवाड, रामदास जाधव, संतोष अंभोरे, कौतिकराव राऊत, योगेश सवडे, प्रकाश राऊत, भगवान भोपळे, पांडुरंग भोपळे, शेख गफ्फार, कैलास गाढे, रमेश चव्हाण, गंजीधर चव्हाण, शारेक सिद्दिकी,अनिल शेजुळ,तुकाराम सोनसाळे ,विठ्ठल जोशी,लक्ष्मण धारे, बाळु देशमुख, राजू बोराडे, उत्तम उगले, शंकर गायके, ऋषी शेळके,बालाजी शेळके, रमेश चव्हाण, प्रल्हाद कळंबे,अंकुश कळंबे, बालाजी शेळके यांच्यासह जाफराबाद तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रोटरी इलाईट कट्ट्याचे लोकार्पण

# रोटरी कट्टा केवळ सुशोभीकरण नव्हे तर सजग समाजनिर्मितीचे प्रतिक - सुधीर लातुरे




**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटच्यावतीने शहराच्या सौंदर्यवर्धनासोबतच नागरिकांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने रोटरी इलाईट कट्टा तयार करण्यात आला असून, त्या अंतर्गत बसस्टॅन्ड रोडवरील पोलीस कॉम्प्लेक्स ते सरोजिनीदेवी रोडचे सुशोभीकरण करून भिंतीवर स्वच्छता, वाहतूक शिस्तीचे संदेश चित्रीत करण्यात आले आहेत. सोबतच या ठिकाणी पार्किंगची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. या रोटरी इलाईट कट्ट्याचे लोकार्पण रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्याहस्ते शुक्रवार दि. ३१ ऑगस्ट रोजी करण्यात आले.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. रोटरी इलाईट कट्ट्याच्या परिसरात बसण्यासाठी आकर्षक बेंचेस, झाडांच्या कुंड्या तसेच भिंतीवर वाहतूक व कायद्याचे नियम आकर्षक चित्रांद्वारे दर्शविण्यात आले आहेत. सजग नागरिक अभियान अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखावी, थुंकू नये, आवाज कमी ठेवावा, इतरांचा आदर करावा, झाडे लावावीत, वाहतूक नियम पाळावेत, अशा सामाजिक शिस्तीचे संदेश भिंतीवर रंगविण्यात आले आहेत. तसेच या ठिकाणी नागरिकांसाठी पार्किंग स्पॉट देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रोटरी इलाईट क्लब आकाराने छोटा असला तरी त्यांचे विचार, उत्साह आणि कार्य मोठे आहे. त्यांनी राबविलेले सजग नागरिक अभियान निश्चितच शहराच्या चेहऱ्यामोऱ्याला नवा आयाम देईल आणि सामाजिक जाणीव वाढवेल. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी क्लबच्या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, रोटरी कट्ट्यामुळे पोलिस प्रशासनाला नागरिकांशी अधिक संवाद साधता येईल. रोटरी क्लब राबवत असलेल्या सामाजिक व आरोग्य उपक्रमांसाठी पोलिस प्रशासनाचे सहकार्य नेहमी राहील. वाहतूक निरीक्षक इंगळे यांनी या परिसराच्या सौंदर्यवर्धनाबद्दल क्लबचे अभिनंदन केले.

इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, शहरातील नागरिकांमध्ये जागरूकतेची भावना निर्माण व्हावी आणि स्वच्छ, सुसंस्कृत वातावरण तयार व्हावे या हेतूने हा कट्टा उभारण्यात आला आहे. महापालिकेने वापरात नसलेल्या मोकळ्या जागा पार्किंगसाठी दिल्यास क्लबच्यावतीने अशा अनेक ठिकाणी पार्किंग स्पॉटसाठी पुढाकार घेतला जाईल. या प्रसंगी क्लब सचिव शरद गादिया, विजयालक्ष्मी बाले, राजेंद्र अग्रवाल, अनया अग्रवाल, स्मिता चेचानी, गणेश बाले, रवींद्र हुसे, प्रदीप भारजवाल, गिरधर लधानी, डॉ. प्रल्हाद उढाण, कैलास दुधानी, विनोद देशमुख, सुचिता देशमुख विनोद बरवार, कैलास शिंदे, श्रीकांत दाड, युवा प्रतिनीधी माधव चेचानी यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायंकाळी प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी क्लबला अधिकृत भेट देऊन राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. यावेळी सदस्यत्व स्वीकारलेले माधव चेचानी हे सर्वात कमी वयाचे रोटेरियन ठरले. या कार्यक्रमात अजित उपाध्याय, प्रियंका तनपुरे, मीरा मोहिते, मनीषा पांडे आणि खुशालराव नागरे या पाच आदर्श शिक्षकांना नेशन बिल्डर अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले तर संतोष करवा आणि राजेश लुनिया यांचा उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेश बजाज यांनी, सूत्रसंचालन रवींद्र हुसे आणि संगीता गादिया यांनी केले तर आभार सचिव शरद गादिया यांनी मानले.


# आस्वाद पुस्तकांचा

**शुभांगी पासेबंद**

माध्यम भूषण हे देवेंद्र भुजबळ यांचे न्यू स्टोरी टुडे या प्रकाशन संस्थेतील सर्वेसर्वा यांच्या पोर्टलवर प्रकाशित झालेल्या लेखनाचे हे संकलन आहे. हे पुस्तक ग्रंथाली तर्फे निर्मित असून सौ अलका भुजबळ यांनी प्रकाशित केले आहे. मूल्य चारशे रुपये असून, पृष्ठे १७८ आहेत. माध्यम भूषण हे शीर्षक भूषणावह वाटते. महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या, संचालक पदावर काम केलेले, जेष्ठ अधिकारी देवेंद्र भुजबळ यांचे हे माध्यम भूषण हे पुस्तक त्यांनी सादर केले आहे.

सुरुवातीलाच अर्पण पत्रिकेत श्रीयुत भुजबळ सर असं म्हणतात की :'अतिशय निष्ठेने माध्यम धर्म पाळणाऱ्या ,सर्व माध्यम-कर्मींना हे पुस्तक अर्पण केले आहे.'

हे पुस्तक वाचनीय आहे. आयुष्यात अनेक विपरित परिस्थितींवर, संकटांवर मात करून पुढे गेलेल्या अंदाजे ३६ व्यक्तींबद्दलचे अल्प पण प्रातिनिधिक परिचय या पुस्तकात आहेत. पुस्तकाला सुरुवात आदरणीय मधु मंगेश कर्णिक यांच्यापासून होते .आशयामध्ये अनेक महत्त्वाच्या व्यक्ती ,वासंती वर्तक, किरण चित्रे,डॉ महेश केळुसकर, मेघना साने, वासंती वर्तक, स्मिता गव्हाणकर,डॉ सुलोचना गवांदे ,प्राध्यापिका डॉक्टर सुचिता पाटील आणि अन्य अशा ३६ लोकांचे बद्दलचे प्रेरक असे लेख आहेत. तरुणांना आजकाल आदर्श शोधणे अवघड झालेलं असताना या पुस्तकातील लेख वाचून तरुण प्रेरणा घेऊ शकतात.




दिवसेंदिवस नोकरी अथवा व्यवसाय करणे दोन्ही अवघड असताना प्रतिकूल परिस्थितीने तरुणांवर परिणाम होतो .त्यावेळी हे लेख निश्चित प्रेरणा देतील. देवेंद्र भुजबळ यांनी लिहिलेली विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या व्यक्ती ची बद्दल लिहिलेली ही सुबक व्यक्तिचित्र या पुस्तकात आहे.

**माध्यम भूषण**
**लेखक देवेंद्र भुजबळ**
**पृष्ठ १७८**
**मूल्य चारशे रुपये**
**मुखपृष्ठ हेमंत जोशी**

# तुळशी विवाह

तुलसि श्रीसखि शुभे पापहारिणि पुण्यदे ।
नमस्ते नारदनुते नारायणमनःप्रिये ।। - तुलसीस्तोत्र, श्लोक १५

अर्थ : हे तुलसी, तू लक्ष्मीची मैत्रीण, शुभदा, पापहारिणी आणि पुण्यदा आहेस. नारदाने स्तवलेल्या आणि नारायणाला प्रिय अशा तुला मी वंदन करतो.

हिंदु धर्मात तुळशीला देवी स्वरूपात पूजतात. आपण इतरवेळी तुळशिमाता म्हणून तिची पूजा करीत असलो तरीही कार्तिक शुद्ध द्वादशीपासून ते पौर्णिमेपर्यंत या कालावधीत तिला कन्या रुपात पूजन करून भगवान विष्णूच्या शाळीग्राम रूपाशी किंवा श्रीविष्णूचा (बाळकृष्णाच्या मूर्तीचा) तुळशीशी विवाह करतात, पूर्वीच्या काळी बालविवाहाची पद्धत होती. हा विवाह विधी पूजोत्सव म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे. (विष्णू पुराण, पद्म पुराणासह अनेक धार्मिक ग्रंथांमध्ये तुळशी विवाहाचा उल्लेख आहे. )

**दरवर्षी तुळशीविवाह का?**

तुळसी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. हे व्रत केल्याने कर्त्याला कन्यादानाचे फल मिळते असे मानतात. तुळसी विवाह व्रत हे एक काम्य व्रत आहे.

यामुळे सर्व इच्छा पूर्ण होतात आणि वैवाहिक जीवनात येणारे अडथळे दूर होतात. उत्तम संततीप्राप्त होते.

प्रत्येक विवाहित स्त्रीने तुळशी विवाह नक्की केला पाहिजे असे मानले जाते. असे केल्याने अखंड सौभाग्य प्राप्त होते.

घरच्या कन्येस श्रीकृष्णासारखा आदर्श वर मिळावा या हेतूने तुळशी विवाह करतात. (जोशी, महादेवशास्त्री (२००१). भारतीय संस्कृती कोश खंड ५. पुणेः भारतीय संस्कृतीकोश मंडळ प्रकाशन.)

तुळशी विवाह झाल्यानंतर चातुर्मासात जी व्रते घेतलेली असतील त्या सर्वांचे उद्यापन करतात.

विवाह संस्काराचे महत्व भावी पिढीला कळावे. यासाठी हा पूजोत्सव प्रत्येकाने आपल्या घरी अवश्य करावा.

**तुळशीचे महत्व**

हिंदू धर्मात तुळशीला पापनाशिनी म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. तुळशीचे केवळ आध्यात्मिक महत्व नसून आयुर्वेदात सुद्धा तिचे तितकेच महत्व आहे.

तुळस बहुगुणी आणि प्रभावी औषध आहे. त्यामुळे शास्त्राने देवपूजा व श्राद्ध यामध्ये तुळस आवश्यक सांगितली आहे.

एखाद्याच्या गळ्यात तुळशीची माळ असणे, हे धार्मिकतेचे व सदाचाराचे प्रतीक मानले जाते.

श्रीविष्णूला तुळस अतिशय प्रिय आहे. तुळशीचे पान वाहिल्याने तो जितका प्रसन्न होतो, तितका अन्य कशानेही प्रसन्न होत नाही.

तुळशीवरील उदक मस्तकी धारण केल्यास गंगास्नानाचे पुण्य लाभते.

तुळशीपूजेशिवाय नित्य पूजा पूर्ण होत नाही.

मरतेवेळी अंगावर तुळशीपत्र असणारा मनुष्य वैकुंठात जातो, अशी श्रद्धा आहे.

तुळशी दुषित वायू शोषून घेते आणि प्राणवायू सोडते, त्यामुळे वातावर शुद्ध होण्यास साहाय्य होते. हे विज्ञानाने सुद्धा सिद्ध केले आहे. म्हणून दारोदारी तुळशी वृंदावन बांधले जाते. तसेच शहरी भागात खिडकीतल्या कुंडीत, दाराजवळ तुळशीचे रोप लावले जाते. दारात तुळशी असणे, हे शुभ मानतात.

**तुळशी विवाहाची आख्यायिका**

कांचीनगरीत कनक नावाचा राजा होता. त्याला नवसाने एक मुलगी झाली तिचे नांव किशोरी होते. तिची पत्रिका पाहून ज्योतिषाने सांगितले जो तिच्याशी विवाह करेल त्याच्या अंगावर वीज पडून तो मरेल. एका ब्राह्मणाने किशोरीला द्वादशाक्षरी विष्णू मंत्र सांगितला त्या मंत्राचा जप करावा, तुळशीची पूजा व कार्तिक शुद्ध नवमीला तिचा विष्णूशी विवाह लावावा असे व्रत त्यांनी सांगितले व ती त्याप्रमाणे करू लागली. एकदा एक गंध्याने तिला पाहिले व तो तिच्यावर मोहित झाला माळिणीच्या मदतीने स्त्री वेष घेऊन त्या माळिणीबरोबर तो किशोरीकडे आला. ती माळीण म्हणाली, ही माझी मुलगी आहे. फुलांची रचना करण्यात तरबेज आहे. तुला देवासाठी फुलांच्या नाना प्रकारच्या रचना करून देत जाईल. गंधी किशोरीकडे दासी म्हणून राहू लागला. कांची राजाचा पुत्र मुकुंद हाही किशोरीवर मोहित झाला होता. तो सूर्याची खूप उपासना करायचा. सूर्याने स्वप्नात दृष्टांत देऊन त्याला सांगितले की, तू किशोरीचा नाद सोडून दे तिच्याशी विवाह करणारा वीज पडून मरेल. मुकुंद सूर्याला म्हणाला, तुझ्यासारख्या देवाला तिचे वैधव्य टाळता येईल. किशोरी मला लाभली नाही तर मी अन्न पाणी वर्ज्य करून मरून जाईन. सूर्याने किशोरीच्या वडलांना दृष्टांत देऊन सांगितले की राजपुत्र मुकुंदाला तू आपली मुलगी दे. कनक राजाला हा विवाह मान्य करणे भाग पडले. कार्तिक द्वादशी ही लग्नाची तिथी ठरली. गंध्याला हे सर्व कळले. तो खूप दुःखी झाला, व त्याने ठरवले की, लग्न मंडपात जाण्याआधी तिचा हात धरायचा त्याच वेळी मेघगर्जनांसह विजा कडकडल्या किशोरीही भांबावून गेली व ती बाहेर आली व गंध्याने तिचा हात धरला व त्याच क्षणी गंध्याच्या डोक्यावर वीज कोसळली व तो मरण पावला. नंतर राजपुत्र मुकुंद याच्याशी तिचा विवाह झाला. तुळशी व्रताच्या प्रभावाने किशोरीचे वैधव्य टळले. (संदर्भ : व्रतराज ग्रंथ)

**तुळशी विवाह संध्याकाळी का करतात?**

ही वेळ गोधूलीची ( गाई चरुन घरी येण्याची वेळ ) म्हणजे सायंकाळची असते.प्रबोधिनी एकादशीला श्रीविष्णू योग निद्रेतून जागे होतात आणि सृष्टी संचलानाचे कार्य पुन्हा सुरू करतात असे मानतात. तुळशी विवाहाच्या कालावधीत वातावरणात विष्णू तत्व आणि लक्ष्मी तत्व खूप जास्त प्रमाणात कार्यरत असते. त्याचा एकत्रित लाभ जीवाला व्हावा यासाठी संध्याकाळी तुळशी विवाह करतात.

**तुळशी विवाहाची पूर्वतयारी आणि प्रत्यक्ष पूजाविधी :**

कन्या मानून, घरातील तुळशी वृंदावनाची-तुळशीचे रोप असलेल्या कुंडी आणि तुळस यांना सजवतात.

काही स्त्रिया आषाढी एकादशीला तुळशीचे रोप लावून ते वाढवतात आणि त्या तुळशीचा विवाह करतात.

तुळशीची कुंडी चुना आणि गेरूने रंगवून सुशोभित करतात. त्यावर राधा-दामोदर प्रसन्न असे लिहीतात.

तुळशीच्या चारी बाजूने ऊस लावून ऊसाचा मांडव करतात. उसाला मामाचा मान आहे, असे मानतात.

तुळशीला जरीचे नवीन वस्त्र पांघरावे. भगवान विष्णूला पिवळे वस्त्र घालावे. घरामध्ये शालिग्राम असल्यास ते पिवळ्या कपड्यात गुंडाळून तुळशीच्या मुळामध्ये ठेवावे.

वृंदावनांतील तुळशींत चिंचा, बोर, आवळे, सीताफळ, चातुर्मासात त्याज्य केलेल्या भाज्या जसे वांगी, कांदा आदी ठेवतात.

तुळशीसाठी सौभाग्य अलंकारः- मणी- मंगळसूत्र, जोडवे- विरोदे, हिरव्या बांगड्या, करंडा, फणी इ. वृंदावनात तुळशीच्या मुळाशी ठेवावे.

पूजेसाठी चौरंग, नागवेलीची पाने, सुपाऱ्या, खारीक, बदाम, फुले, हळद, कुंकू, शंख - घंटा, पळी, ताम्हण, फुलपात्र, हळकुंड, अष्टगंध, गहू, तांदुळ, अक्षतासाठी रंगीत तांदुळ, जानवे जोड, तूप, पंचामृत, निरनिराळी फळे, लाह्या, बत्तासे, खोबर्याच्या वाट्या, फराळाचे साहित्य, आंतरपाटासाठी कापड, हात पुसायला रुमाल, बसायला पाट किंवा आसन इ. साहित्य घ्यावे.

अंगण सारवून किंवा सदनिकेत रहात असल्यास स्वच्छता करून लादी स्वच्छ पुसावी. त्यावर विष्णू तत्व किंवा कृष्ण तत्वाची रांगोळी काढल्यास उत्तम. अन्यथा शक्य तशी सात्विक रांगोळी काढावी. तुळशी भोवती रांगोळी काढावी.

तुळशीसमोर पाटावर तांदुळाचे स्वस्तिक काढून त्यावर बाळकृष्ण ठेवावा. बाळकृष्णाचे तोंड पश्चिमेकडे असावे.

तुळशीच्या मुळामध्ये तुपाचा दिवा लावावा. (धर्मसिंधु ग्रंथ)

दाराला आंब्याच्या पानाचे आणि झेंडूच्या फुलांचे तोरण बांधावे. शक्य असल्यास केळीचे गाभे, झेंडूच्या फुलांच्या माळा बांधून लग्न मंडप सुशोभित करावा.

कुटुंबातील कर्ता पुरुषाने स्नान करून तुळशीची आणि कृष्णाची पूजा करावी.

विवाह संस्काराप्रमाणे बाळकृष्ण व तुळशीला चढती हळद लावावी. नंतर दोघांची षोडशोपचारे, पंचोपचारे पूजा करावी. (श्रीसूक्त व पुरुषसूक्ताचा अभिषेक करावा) मंगलाष्टक म्हणण्याआधी पुण्याहवाचन विधी करावा. (सक्तीचे नाही) त्यानंतर दोघांमध्ये अंतरपाट धरून, उपस्थितांना अक्षता वाटाव्यात. मंगलाष्टक झाल्यानंतर उपवर मुलीने तुळशीच्या वतीने बाळकृष्णास हार घालावा. उपवर मुलगा- मुलगी नसल्यास इतरांनी घालावा. त्यानंतर बाळकृष्णाच्या वतीने तुळशीला मणी- मंगळसूत्र, ओटीचे साहित्य व इतर साहित्य उपवर मुलगा वाहील. ज्यांना संपूर्ण विधी शक्य नसल्यास फक्त ‘अलंकार समर्पण’ पर्यंत केला तरी चालतो. (संकलन- सदानंद पाटील, रत्नागिरी.)

कर्त्याने यानंतर तुळशीचे कन्यादान करावे व नंतर मंत्रपुष्प आणि आरती करावी.

या विधीच्या वेळी तुळशीभोवती दीप आराधना करण्याची पद्धती आहे. (जोशी, महादेवशास्त्री (२००१). भारतीय संस्कृती कोश खंड ५. पुणेः भारतीय संस्कृतीकोश मंडळ प्रकाशन.)

आनंद व्यक्त करण्यासाठी लग्न लागल्यावर टाळ्या आणि सात्विक वाजंत्री वाजवण्याची प्रथा आहे. (शास्त्र आधार नाही.)

फराळाच्या साहित्याचा प्रसाद दाखवून तो प्रसाद सगळ्यांनी ग्रहण करावा.

**तुळशी विवाहाचा आध्यात्मिक लाभ होण्यासाठी पुढील कृती करा :**

विष्णू आणि लक्ष्मी तत्वाचा लाभ होण्यासाठी विवाहाची पूर्वतयारी करतांना प्रत्यक्ष लक्ष्मी माता आणि श्री विष्णूचा विवाह आहे असा भाव ठेवावा.

श्री विष्णू आणि श्री लक्ष्मी यांना शरण जाऊन 'तुम्हाला अपेक्षित असलेली विवाहाची पूर्वतयारी करून घ्यावी ' अशी प्रार्थना करावी.

तुळशी विवाह असला तरीही लगीनघाई असतेच. त्यात बरेचदा मनावर कामाचा ताण येतो, चिडचिड होते, असे होऊ नये आणि तुळशी विवाह भावपूर्ण व्हावा यासाठी स्वतःच्या मनाचे सतत निरीक्षण करावे. मनाला आनंदी आणि सकारात्मक ठेवण्याचा प्रयत्न करावा.

सगळ्या कामाचे पूर्व नियोजन करावे. विवाहाच्या कामात घरच्या सगळ्यांना यथाशक्ती सहभागी करून घ्यावे.

हा पूजोत्सव भावपूर्ण संपन्न झाला म्हणून श्री विष्णू आणि श्री लक्ष्मी यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करावी.

**प्रदेशानुसार तुळशी विवाह प्रथा :**

गोवा, दीव आणि दमण येथे तुळशीविवाह सार्वजनिकरीत्या साजरा होतो. तुळशीची व बाळकृष्णाची वाद्यांच्या आणि फटाक्यांच्या दणदणाटात मिरवणूक निघते. सन २०१७मध्ये गोव्याच्या राज्यपालांनी तुळशीचे कन्यादान केले होते. हे नवभारत टाइम्स मधे सुद्धा प्रसिद्ध झाले होते.( २. ११. २०१७.)

महाराष्ट्रात तुळशी विवाह घरोघरी आणि मंदिरात करतात.

**तुळशी विवाहाचे बदलते स्वरूप :**

हा पूजोत्सव भावपूर्ण व्हावा यापेक्षा हल्ली दिखाव्याकडे कल अधिक असतो. इलेक्ट्रिकची रोषणाई, कृत्रिम भपकेबाज सजावट, फटाक्यांच्या आतिषबाजी चा अतिरेक, तर काही ठिकाणी फराळ ऐवजी बुफे घेण्याच्या चुकीच्या प्रथा रूढ होऊ लागल्या आहेत.

तुळशी विवाह हा पूजोत्सव भारतीय संस्कृतीची अनोखी ओळख आहे. तिची शास्त्रशुद्ध माहिती जाणून घेऊन हा पूजोत्सव साजरा करू या आणि आपल्या संस्कृतीचे जतन करू या.

**संकलन- दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

परतूरातील अग्निशामक दल ते बस स्टॅन्ड तसेच टेलिफोन भवन ते शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग रस्त्यासह शहरातील १० कोटी रुपये किमतीच्या अंतर्गत रस्त्यांचे भूमिपूजन

# परतूर शहरासाठी नगरपालिकेत सत्तेत नसतानाही ७०० कोटी रुपयाचा निधी दिला - आमदार बबनराव लोणीकर

## पालिकेत सत्ता द्या, परतूरच्या विकासाचा अनुशेष भरून काढू - भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर





**परतूर । प्रतिनिधी -** परतूरच्या नगरपालिकेत सत्ता नसतानाही आपण ७०० कोटी रुपयांचा निधी शहरासाठी आत्तापर्यंत दिलेला असून, त्यातून नाट्यगृहासारखी सुंदर वास्तू (१७ कोटी) मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह (१० कोटी) कोर्ट इमारत (१९ कोटी) सांडपाणी व्यवस्थापन (४५ कोटी) परतुर शहराची पाणीपुरवठा योजना(५५ कोटी) रेल्वे लाईन उड्डाणपूल (५६ कोटी) नवीन नगरपालिका इमारत (६ कोटी) यासह अनेक विकास कामे आपण शहरात केलेली असून यावेळी परतुर ची जनता निश्चितच भाजपाच्या हाती सत्ताधिक असा विश्वास माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

ते परतुर येथे टेलिफोन भवन ते शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग अग्निशामक दल ते बस स्टँड या शहरातील विविध भागात असलेल्या अंतर्गत १० कोटी रुपये किमतीचा रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन समारंभ प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदार संघाचा विकास करीत असताना नियमितच आपण परतूर शहरासाठी झुकते माप दिले असून हॅलो शहरातील विकास कामे करताना समतोल विकास साधला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

येणाऱ्या निवडणुका ह्या अतिशय महत्त्वाच्या असून परतुर पालिकेची सत्ता मिळवण्यासाठी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी कसून काम करण्याची गरज असून आपण केलेल्या विविध विकास कामांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले पुढे ते म्हणाले की परतूर शहरासाठी १९०० घरकुल आपण पुढाकार घेऊन मंजूर केले होते त्यातील अनेक घरकुलांचे कामे पूर्ण झाले असून शहरातील सर्वसामान्य गोरगरिबांसाठी आपण सदैव तत्पर राहिलो आहोत असे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आपण आमदार म्हणून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या बांधावर गेलो अनेक ठिकाणी जाऊन पाहणी केली शेतकऱ्यांची पिके उध्वस्त झाली असल्याचे प्रशासकीय अहवाल पाठवण्यासाठी अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या त्याचबरोबर मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यासोबत भ्रमणध्वनी पत्रव्यवहार करून शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी केली त्या मागणीला यश आले असून जालना जिल्ह्यासाठी ४२१ कोटी रुपये तर परतूर मंठा नेर शेवली या भागातील शेतकऱ्यांना १०७ कोटी रुपये त्यात परतूर तालुक्यासाठी ४८ कोटी ८१ लक्ष, मंठा तालुका ४७ कोटी ४८ लाख नेर शेवली ११ कोटी ९ लाख असा मोबदला अतिवृष्टी धारकाना मिळणार असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर रकमा जमा होणार असल्याचे या वेळी ते म्हणाले

तर भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की, यावेळी परतूर शहरातील सुदान जनता भारतीय जनता पार्टीच्या हातामध्ये निश्चितपणे सत्ता देणारा असून येणारा नगराध्यक्ष हा भारतीय जनता पार्टीचा असेल असा विश्वास यावेळी बोलताना राहुल लोणीकर यांनी व्यक्त केला

पुढे बोलताना ते म्हणाले की, परतूर शहरातील जनतेला कळून चुकले असून विकास फक्त आमदार बबनराव लोणी करत करू शकतात त्यामुळे निश्चितच यावेळी जनता भाजपाला साथ देईल असे त्यांनी सांगितले

### विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपामध्ये प्रवेश

शहर भाजपाचे सिद्धेश्वर लहाने यांच्या पुढाकाराने परतुर शहरातील कुणाल राजपूत रहीम शेख शाहिद शेख करीम शेख राजू शेख अमजद शेख महेंद्र चांदर महेश नळगे दत्ता कदम आदित्य काळे गोपाल सुरसुरी वाले शुभम मोरे श्रावण कवडे आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला

या कार्यक्रमासाठी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या सह भगवानराव मोरे दया काटे भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर, संभाजी वारे माणिकराव वाघमारे माऊली तनपुरे संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे सुबोध चव्हाण दिनेश होलानी गणेश पवार सनी तनपुरे, संतोष हिवाळे, सावता काळे शहाजीराक्षी नाजीम काजी सरफराज कायमखानी प्रमोद राठोड बालाजी सांगोळे अमोल अग्रवाल अर्जुन जगताप संभाजी घनवट राजेंद्र मुंदडा बाळू तनपुरे किसन राऊत अमर बगडिया आनंद कोटीच्या , सतीश सोनवणे नरेश कांबळे इंद्रजीत हिवाळे पृथ्वीराज अंभोरे किशोर कद्रे गजानन चौडे दीपक पुरी सोपान जईद कुलदीप बिनगे लालजी निर्वळ विकास बोडके विजय यादव नामदेव गोरे मुजू कायमखानी मलिक कुरेशी सिद्धेश्वरला लहाने कैलास चव्हाण सूर्यभान कदम गणेश सोळंके सुंदर मुळे मुरली सोनखेडकर सोनू डोलारकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# अजिंठा येथे ५ नोव्हेंबर रोजी २० वी बौद्ध धम्म परिषद

**जालना । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्युट ऑफ पाली न्ड बुद्धिझम या संस्थेच्या वतीने धम्माचल अजिंठा(फर्दापूर ता. सोयगाव) येथे दिनांक५ नोव्हेंबर (कार्तिका पौर्णिमा) २० व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या धम्म परिषदेचे उद्घाटन दुपारी १२ वाजता होणार असून परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तथा धम्माचल ट्रस्टचे उपाध्यक्ष इंजि .अनिलकुमार गायकवाड हे राहणार आहेत. दक्षिण कोरियामधील कोरीयन बौद्ध धर्माचे डेगक जोंगचे प्रमुख भदन्त मास्टर लि चँग बे यांच्या हस्ते या बौद्ध परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी दक्षिण कोरियाचे भदन्त लि मायोन बे यांच्या हस्ते ' धम्माचल' या स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे.
दक्षिण कोरियातील डेगाक ऑर्डरचे तपासणी संचालक भदन्त मास्टर लिम मुसोंग , भिख्खू डॉ. फ्रा. अचान सिट्टीचोक सोमवरण, सिने अभिनेते गगन मलिक, दक्षिण कोरियाचे माजी राज्यपाल किम डू क्वान, थायलंड येथील मा. सिरीयक फाऊंडेशनचे अध्यक्ष सिरीयक फाट्रा फ्रसिट मैथाई , परभणी येथील सामाजिक व धार्मिक कार्यकर्ते सिध्दार्थ हत्तीअंभिरे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तत्पूर्वी सकाळी १० वाजता दक्षिण कोरियातील डोंगबँग बुद्धिस्ट विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. लि ची रॅन यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण होणार आहे.

या धम्म परिषदेत भदन्त धम्मसेवक महाथेरो, भदन्त शरणानंद महाथेरो, भदन्त खेम धम्मो महाथेरो, भदन्त बोधिपालो महाथेरो, आदी भिक्खू संघाची प्रमुख धम्मदेसना देणार आहेत.

या धम्म परिषदेस बौद्ध उपासक- उपासका यांनी उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक डॉ. एस.पी. गायकवाड, सचिव भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो, भदन्त धम्ममधर शाक्यपुत्र थेरो, भदन्त सिवली शाक्यपुत्र थेरो,उपासक अनुराधा संजय हेरकर, कांताबाई रत्नपारखे,सुधाकर निकाळजे, कैलास खरात, सुदामराव सदाशिवे, महेंद्र रत्नपारखे, गयाबाई साळवे, छाया हिवाळे, संदीप खरात, निखिल पगारे, , वंदना भास्कर घेवंदे, प्रा. शोभा भास्कर शिंदे, जी. आर. चिकटे, राहुल प्रधान, अशोक गंगावणे, रंजित अरुण मगरे, राजकुमार दांडगे, विशाल सोनवणे, दादाराव लहाने, सुनिल जाधव, बालू बोर्डे, विशाल सोनवणे, दिलीप हिवाळे, सुनील गंगावणे , लक्ष्मीबाई काकडे आदींनी केले आहे.

अपघातग्रस्त कुटुंबाला बुलडाणा अर्बनचा आधार

# वारसाला पावणे तीन लाखांचा धनादेश सुपूर्द



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील तरुण शेतकरी सुरेश रुस्तुम डहाके यांच्या अपघाती मृत्यूनंतर बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देत मानवतेचा उत्तम दाखला घातला आहे.

दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी सुरेश डहाके हे स्वतःच्या मोटारसायकलवरून प्रवास करत असताना फोर व्हिलर वाहनाच्या धडकेत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. मृत्यूच्या आधी त्यांचे बुलडाणा अर्बन बँक, टेंभुर्णी शाखेत दोन लाख तेहेचाळीस हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट (FD) होते.

बँकेच्या विशेष अपघात विमा योजनेअंतर्गत, संबंधित ठेवीदाराचा अपघाती मृत्यू झाल्यास, त्याच्या ऋऊ रकमेइतकीच विमा रक्कम वारसाला देण्यात येते. या योजनेचा लाभ घेत, डहाके यांच्या वारसास - पत्नी श्रीमती कुशीवर्ता बाई डहाके यांना - एकूण रु २,७७,४६४/- इतका धनादेश सुपूर्द करण्यात आला.

धनादेश सुपूर्दगीचा समारंभ बुलडाणा अर्बन बँक टेंभुर्णी शाखेत पार पडला. या वेळी विभागीय अधिकारी नितीन परदेशी, ज्येष्ठ संचालक देवीदास देशमुख, अलकेश सोमाणी, प्रदीप काबरा, गजानन उगले, डॉ. अविनाश सुरुशे, डॉ. प्रशांत काबरा, राजू शिंदे, तसेच शाखा अधिकारी पंढरीनाथ मिसाळ आणि विशाल डहाके उपस्थित होते.

या प्रसंगी श्रीमती कुशीवर्ता डहाके यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, आमच्यासारख्या सामान्य कुटुंबासाठी ही मदत म्हणजे आधाराचा हात आहे. बुलडाणा अर्बनने दाखवलेली संवेदनशीलता आम्ही आयुष्यभर लक्षात ठेवू.

बुलडाणा अर्बनची ही योजना केवळ ठेवीदारांसाठी आर्थिक सुरक्षिततेची हमी नसून, संकटाच्या काळात कुटुंबाला दिलासा देणारा खरा 'मानवी स्पर्श' ठरत आहे.

# जाफ्राबाद येथे नगरपंचायत कार्यालयांवर मुलभूत सुविधांच्या मागण्यांसाठी धडक मोर्चा

## निकृष्ट कामाचं प्रतीकात्मक बॅनर बनवून; नागरिकांच्या मोर्च्याचे केलं सतिश साळवेनी नेतृत्व

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** येथील वार्ड क्रमांक पाच मध्ये आनंद बौद्ध विहार असून या ठिकाणी विहाराच्या पाठीमागील परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात नालीचे पाणी व वाहून आलेली घाण साचली असून त्या ठिकाणी नाल्या पूर्णपणे ब्लॉक झालेल्या आहेत,रोडवर जास्त प्रमाणात माती साचलेली असून त्या ठिकाणी चिखल साचत आहे. व तिथं राहणाऱ्या व येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना याचा खूप जास्त त्रास होत आहे. व्यवस्थित लाईट नाहीत,वार्ड क्रमांक ७ व ८ इंदिरानगर मध्ये रोडचे नालीचे काम पूर्णपणे रखडलेले आहे.रमाई नगर,दत्त मंदिर या परिसरामध्ये स्थानिक लोकांना पिण्याचे अस्वच्छ पाणी मिळत असून. या परिसरात कोणत्याही प्रकारच्या नालीची सुविधा नाही व त्यांतच हा परिसर जंगलमय भागांमध्ये असल्यामुळे येथील लोकांना रात्रीला अंधाराचा सामना करावा लागत आहे.
अण्णा नगर,दौलतपुरा परिसरामध्ये दहा घर आहे की,ज्यांना दहा वर्षापासून नळ कनेक्शनची सुविधा उपलब्ध नाही. हे वारंवार नगरपंचायतला निवेदन देऊन सुद्धा यांच्या कडे कोणी लक्ष देत नाही व घरासमोरील नाल्या पूर्णपणे जाम झालेल्या असून त्यामध्ये वार्डात सर्व सांडपाणी साचत आहे.
तसेच इंदिरानगर परिसरातील गुलशन कलेक्शन पासून इमरान खान यांच्या घरापर्यंत मोठा नाला असून त्यामध्ये खूप जास्त घाण साचली असून स्थानिक लोकांना त्याचा खूप जास्त प्रमाणात परिणाम भोगाव लागत आहे. पाशुशाह याच्या घरापासून ते शाहिद शाह यांच्या घरापर्यंत अंडर ग्राउंड नालीची सुविधा उपलब्ध करून द्यावी.असे सांगतं असताना या परिसरात आजी माजी नगरसेवकांनी केलेल्या निकृष्ट कामांचे प्रतीकात्मक बॅनर बनवून,निकृष्ट काम केल्याबद्दल नागरिकांच्या वतीने नगरपंचायत प्रशासनाचं अभिनंदन असे बॅनर लावून निषेध व्यक्त केला.
सोबतच पंतप्रधान आवस योजना मध्ये योग्य लाभार्थ्यांकडून बांधकाम परवान्यासाठी जे ५०० रुपये आकारत आहात ते माफ करा,पंतप्रधान आवास योजना मध्ये जाफ्राबाद शहरातील गोर गरीब लाभार्थी यांच्या कडून घरकुल लाभ घेण्या करीता एकावर्षा चा कर वसूल करणे थांबवा,नगरपंचायतने नाल्याची सफाई करून (ड्रेनेज नालीची) सुविधा करून द्यावी. प्रत्येक ठिकाणी हाई मास्क लाइट लावून अंधार दुर करावा,धडक कामगार युनियन महासंघाच्या माध्यमातून वयाचं कारण दाखवून चालू कामावरून कामगार महिला आणि पुरूषांना कामावरून कमी केलेले आहे त्या कामगारांचे थकीत मानधन देऊन त्यांना किंवा त्यांच्या वारसांना कामावर रुजू करावं,असे नगरपंचायत कार्यालयात समोर बोलत सांगून आमच्या मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सतिश साळवे यांनी नगरपंचायत प्रशासन तथा अध्यक्ष यांना देण्यात आला.



# प्रनिल काळे यांना पीएचडी पदवी प्रदान

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** डॉ. प्रनिल सुनिल काळे यांनी सॅम हिग्गिनबॉटम कृषी, तंत्रज्ञान आणि विज्ञान विद्यापीठ, प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथून कृषी व्यवसाय व्यवस्थापन या विषयात, कृषी अर्थशास्त्र विभागांतर्गत पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.

त्यांनी कॉटन कल्टिव्हेशन, सीड प्रोडक्शन अॅन्ड मार्केटिंग डायनॅमिक्स इन औरंगाबाद न्ड जालना डिस्ट्रिक्ट ऑफ महाराष्ट्र स्टेटः न इकॉनॉमिक नालिसिस या विषयावर प्रा. डॉ. आशिष समर्पित नोएल यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल संशोधन केले. या अभ्यासातून मराठवाड्यातील कापूस शेती, बियाणे उत्पादन व विपणन प्रक्रियेचे आर्थिक विश्लेषण करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी धोरणात्मक उपाय सुचविण्यात आले आहेत. डॉ. काळे यांनी कृषी पदवी शिक्षण छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित कृषी महाविद्यालय, कांचनवाडी (जि. छत्रपती संभाजीनगर) येथे पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षण त्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत अॅग्री बिझनेस मॅनेजमेंट, चाकुर येथे पूर्ण करून सुवर्णपदक मिळवले.

पीएच.डी. शिक्षणादरम्यान त्यांना छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती - २०२२ मिळाली असून, त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये उत्कृष्ट सादरीकरणासाठी पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्यांचे वडील सुनिल रेणुकादास काळे (एलआयसी, छ. संभाजीनगर), मातोश्री सौ. प्रविणा काळे (गृहिणी), पत्नी सौ. प्रियांका



काळे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ) व बहिण चैत्राली काळे (आयडीबीआय बँक, अंबाजोगाई) यांच्या प्रोत्साहनामुळे हे यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. काळे यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.